८.२०
५-४-२०२४

# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com

दिनांक : ०५/०४/२०२४

## प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सात ठिकाणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रस्त्याच्या रुंदीकरणाचे व कॉंक्रिटीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच शहरात भुयारी गटार योजनेचे काम देखिल सुरु आहे. पावसाळयापूर्वी सदरची काम पूर्ण करणे, तसेच रस्त्याच्या खोदकामामुळे नागरिकांना होणारा त्रास यावर चर्चा करुन उपाययोजना करणेकामी दिनांक ०४/०४/२०२४ रोजी मा.प्रशासक तथा आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता श्री.अर्जुन कोरगांवकर, श्री.अरविंद धाबे, कार्यकारी अभियंता राजेंद्र देवरे, अतिरिक्त आयुक्त श्री.जमीर लेंगरेकर, सहायक संचालक नगररचना श्री.खोब्रागडे, शहर अभियंता श्री.संदीप जाधव, कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा श्री.परमेश्वर बुडगे, नोडल अधिकारी श्री.गणेश शिंपी, सहायक आयुक्त श्री.मनीष हिवरे, दत्तात्रेय जाधव, अनिल खतुरानी व इतर अधिकारी उपस्थित होते. तसेच रस्त्याचे व भुयारी गटार योजनेचे काम करणारे सर्व कंत्राटदार, प्रकल्प सल्लागार हे देखिल उपस्थित होते.

शहरात सुरु असणा-या रस्त्याच्या व भुयारी गटार योजनेच्या कामांचा आढावा घेऊन आयुक्तांनी संबधित अधिकारी व कंत्राटदारास पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या.

१. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणा-या रस्त्यांचे काम पावसाळयापूर्वी पूर्ण करणेचे दृष्टीने नियोजन करण्यासाठी आदेश देण्यात आले. रस्त्याचे काम सुरु करण्यापूर्वी सदर ठिकाणी भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण करण्यात यावे.

२. शहरात ज्या ठिकाणी भुयारी गटार योजनेचे काम सुरु आहे त्या ठिकाणी मलवाहिनी टाकून झाल्यानंतर तात्काळ रस्ता पूर्ववत करण्यासाठी व धुळ उडू नये यासाठी नियमीतपणे पाण्याची फवारणी करण्यात यावी. जोपर्यंत रस्ता पूर्ववत होत नाही तोपर्यंत सदर परिसरात दुसरा रस्ता खोदण्यात येऊ नये. नवीन ठिकाणी काम सुरु करण्यापूर्वी महापालिकेतील संबधित अधिकारी यांची परवानगी घेऊनच कंत्राटदाराने कामास सुरुवात करावी.

३. शहरात अनेक ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्ते खोदून नवीन रस्तयांचे काम सुरु असल्याचे दिसून आले.अशाप्रकारे कामास सुरुवात करताना एकाच वेळी भुयारी गटार योजनेसाठी व रस्त्याचे कामासाठी रस्ते खोदले जाणार नाहीत याची खातरजमा करणेसाठी शहर अभियंता यांना आदेश देण्यात आले. तसेच ज्या ठिकाणी रस्त्याचे काम सुरु असेल त्या ठिकाणी संबधित कंत्राटदाराने वाहतुक कोंडी होणार नाही, धुळ उडून प्रदुषण होणार नाही या दृष्टीने खबरदारी घेणेसाठी शहर अभियंता यांना आदेश देण्यात आले.

४. मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दर १५ दिवसांनी संयुक्त आढावा बैठक घेऊन MMRDA व महापालिकेचे रस्ते, मलनि:सारण योजना, पाणी पुरवठा योजना यांच्या कामाची प्रगती तपासली जाणार आहे व नागरिकांच्या या कामाच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारींचे निरसन करण्यात येणार आहे.

५/४/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.